# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या ६९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## मंगळवार, दि.२३ डिसेंबर, २०१४ दुपारी ०१:०० वा.

**व्यवस्थापन परिषदेची ६९ वी बैठक मंगळवार, दि.२३ डिसेंबर, २०१४ रोजी दुपारी ०१:०० वाजता** व्यवस्थापन परिषद कक्षात मा. कुलगुरु महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. मालदार एन. एन. - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | विभागीय सहसंचालिका, सोलापूर विभाग, सोलापूर | सदस्या |
| ३) | डॉ. घुटे व्ही. बी. | सदस्य |
| ४) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम., संचालक, म. व वि. वि. मं. | सदस्य |
| ५) | प्राचार्य श्री. पवार एस. के. | सदस्य |
| ६) | प्राचार्य श्री. धुत्तरगाव एस. सी. | सदस्य |
| ७) | डॉ. सुर्यवंशी एस. एस. | सदस्य |
| ८) | डॉ. शिळीमकर टी. एन. | सदस्य |
| ९) | डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर. | सदस्या |
| १०) | ॲड. श्री. सलगर बी. एस. | सदस्य |
| ११) | डॉ. देशमुख एम. एस. | सदस्य |
| १२) | डॉ. करचे बी. आर. | सदस्य |
| १३) | डॉ. शेख ए. ए. | सदस्य |
| १४) | श्री. गायकवाड बी. आर. | सदस्य |
| १५) | सौ. मोहिते-पाटील पी. पी. | सदस्या |
| १६) | श्री. पाटील बी. पी. परीक्षा नियंत्रक | कायम निमंत्रित |
| १७) | श्री. अनपट एस. बी. प्र. वित्त व लेखा अधिकारी | कायम निमंत्रित |
| १८) | श्री. माळी एस. के., कुलसचिव | सचिव |

**स्वागतः**

मा.कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

**अनुपस्थितीः**

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस प्रा. डॉ. पाटील टी. आर. यांनी दूरध्वनीद्वारे अनुपस्थिती कळविली. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली. अवर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, प्र. सहसंचालक (तं. शि.), तंत्र शिक्षण संचालक यांचे प्रतिनिधी हे सदस्य व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस अनुपस्थित होते.

**सदर बैठकीत खालील प्रमाणे कामकाज झाले.**

**[ ०१ ] दि.२९ नोव्हेंबर, २०१४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

**ठरावः दि.२९ नोव्हेंबर, २०१४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून सर्वानुमते कायम करण्यात आला व ठरावानुसार केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०२ ] महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

(टिपणी: महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर).

**ठराव: महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार मा. कुलगुरु यांनी सादर केलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०३ ] पीजीबीयुटीआर विभागाकडून आयोजित होणाऱ्या विविध बैठकीकरिता उपस्थित राहण्यास्तव समिती सदस्यांकडून मागणी होणारी कार प्रवास परवानगीस मान्यता देण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणीः प्रस्तुत विद्यापीठात पीएच. डी. अभ्यासक्रमास प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांबाबत वेगवेगळ्या कामकाजासाठी खालीलप्रमाणे बैठका आयोजित करण्यात येतात.

**१. विभागीय संशोधन समिती (DRC) २. संशोधन व मान्यता समिती (RRC)**

**३. विद्यापीठ अध्यापन व मान्यता समिती (BUTR)**

उक्त समितीचे सदस्य हे सोलापूर शहराबाहेरील, सोलापूर जिल्ह्याबाहेरील असल्याने बैठकीस उपस्थित राहण्यास्तव समिती सदस्यांकडून वारंवार कारने प्रवास करण्यास परवानगी मिळावी अशी वैयक्तिकरित्या विनंती केली जाते. तथापि, सद्यःस्थितीत एका समिती सदस्यास वैयक्तिकरित्या कारने प्रवास करण्यास परवानगी दिली जात नाही. त्यास्तव समिती सदस्य हे बैठकीस उपस्थित राहण्यास उत्सुक नसतात. उक्त समितीमार्फत अत्यंत महत्वाचे कामकाज केले जात असल्याने समितीचे सर्व सदस्य उपस्थित राहणे आवश्यक असते. त्यास्तव ज्या समिती सदस्यांकडून वैयक्तिकरित्या बैठकीस उपस्थित राहण्यास कारने प्रवास करण्यास परवानगी मागितली जाते अशा समिती सदस्यास कारने प्रवास करण्यास परवानगी मागितली जाते अशा समिती सदस्यास कारने प्रवास करण्यास परवानगी देणे योग्य वाटते.

सबब, पीजीबीयुटीआर विभागाकडून आयोजित होणाऱ्या विविध बैठकीकरिता उपस्थित राहण्यास्तव समिती सदस्यांकडून वैयक्तिकरित्या मागणी होणारी कार प्रवास परवानगीस मान्यता देण्याची बाब विचारार्थ).

**ठरावः विद्यापीठाकडून आयोजित होणाऱ्या विविध बैठकांकरिता उपस्थित राहण्यासाठी एका सदस्यास कार वापरण्यास परवानगी देण्यास आणि प्रवासाच्या प्रति किलोमीटर नुसार देयक आदा करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०४ ] प्रस्तुत विद्यापीठामार्फत सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार देण्याबाबत तयार करण्यात आलेली नियमावली व अर्ज (Application Form) विचारार्थ.**

(टिपणी: राष्ट्रीय मुल्यांकन आणि प्रत्यायन परिषद, (NAAC) बेंगळुर यांचेकडून प्रस्तुत विद्यापीठाचे मुल्यांकन करुन घेण्याची प्रक्रिया चालू आहे. याबाबत नियुक्त केलेल्या Steering Committee ची विद्यापीठातील सर्व संकुलातील संचालकांशी दि.२० सप्टेंबर, २०१४ रोजी झालेल्या बैठकीमध्ये ठराव क्र. २० मध्ये खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

**Item No.20:** To Institute best Teacher, Best Affiliated College and Principal Award.

**Resoluation:** It was resolved that, to initiate due procedure in this regards by the Board of college and University Development Section (BCUD). Item be placed to M.C. for approval with rules for the same.

उपरोक्तप्रमाणे झालेल्या बैठकीमध्ये प्रस्तुत विद्यापीठामध्ये सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार देण्याबाबत ठराव करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत विद्यापीठातर्फे अद्याप एकाही महाविद्यालयास सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार देण्यात आलेला नाही. अथवा सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार देण्याबाबत कोणतीही प्रक्रिया केली गेलेली नाही. तसेच अशा प्रकारचा पुरस्कार देण्याकामी नियमावली तथा अर्ज प्रस्तुत विद्यापीठाकडे उपलब्ध नव्हते त्यामुळे सदरबाबत उपरोक्त प्रमाणे पुरस्कार देण्याबाबत नियमावली तसेच अर्ज (Application Form) तयार करण्याकामी खालीलप्रमाणे समिती नियुक्त करण्यात आलेली होती.

१. प्राचार्य,एस.सी.धुत्तरगाव (अध्यक्ष)
२. प्राचार्य,डॉ.जे.जी.जाधव (सदस्य)
३. प्राचार्य,डॉ.आर.एन.शेंडगे (सदस्य)
४. प्राचार्य,डॉ.बी.एम.भांजे (संचालक म.वि.वि.मं. तथा सदस्य सचिव)

उपरोक्त समितीची दि.१०/११/२०१४ रोजी बैठक आयोजित करण्यात करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार देण्याबाबत नियमावली व अर्ज (Application Form) तयार करण्यात आलेला आहे.

सबब, शै.वर्ष २०१५-१६ पासून प्रस्तुत विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांना सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार देण्याबाबत तयार करण्यात आलेली नियमावली व अर्ज (Application Form) विचारार्थ सादर).

**ठराव: प्रस्तुत विद्यापीठामार्फत सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार देण्याबाबत तयार करण्यात आलेल्या नियमावली व अर्जाच्या नमुन्यास (Application Form) खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**१) पान क्र.४६ वरील मुद्दा क्र.६ मध्ये No. of students appeared च्या कॉलम नंतर Distinction हा कॉलम समाविष्ट करावा असे ठरले.**

**२) पान क्र.४७ वरील मुद्दा क्र.१० मध्ये Total No. of Publications हे वाक्य समाविष्ट करावे असे ठरले.**

**चांगल्या प्रतीचे सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, शाल, बुके असे सदर पुरस्काराचे स्वरुप राहील.**

**[ ०५ ] प्रस्तुत विद्यापीठामार्फत सर्वोत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार देण्याबाबत तयार करण्यात आलेली नियमावली व अर्ज (Application Form) विचारार्थ.**

(टिपणी: राष्ट्रीय मुल्यांकन आणि प्रत्यायन परिषद, (NAAC) बेंगळुर यांचेकडून प्रस्तुत विद्यापीठाचे मुल्यांकन करुन घेण्याची प्रक्रिया चालू आहे. याबाबत नियुक्त केलेल्या Steering Committee ची विद्यापीठातील सर्व संकुलातील संचालकांशी दि.२० सप्टेंबर, २०१४ रोजी झालेल्या बैठकीमध्ये ठराव क्र.२० मध्ये खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

**Item No.20:** To Institute best Teacher, Best Affiliated College and Principal Award.

**Resoluation:** It was resolved that, to initiate due procedure in this regards by the Board of college and University Development Section (BCUD). Item be placed to M.C. for approval with rules for the same.

उपरोक्तप्रमाणे झालेल्या बैठकीमध्ये प्रस्तुत विद्यापीठामध्ये सर्वोत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार देण्याबाबत ठराव करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत विद्यापीठातर्फे अद्याप एकाही प्राचार्यांना सर्वोत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार देण्यात आलेला नाही. अथवा सर्वोत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार देण्याबाबत कोणतीही प्रक्रिया केली गेलेली नाही. तसेच अशा प्रकारचा पुरस्कार देण्याकामी नियमावली तथा अर्ज प्रस्तुत विद्यापीठाकडे उपलब्ध नव्हते त्यामुळे सदरबाबत उपरोक्त प्रमाणे पुरस्कार देण्याबाबत नियमावली तसेच अर्ज (Application Form) तयार करण्याकामी खालीलप्रमाणे समिती नियुक्त करण्यात आलेली होती.

१. प्राचार्य,एस.सी.धुत्तरगाव (अध्यक्ष)
२. प्राचार्य,डॉ.जे.जी.जाधव (सदस्य)
३. प्राचार्य,डॉ.आर.एन.शेंडगे (सदस्य)
४. प्राचार्य,डॉ.बी.एम.भांजे (संचालक म.वि.वि.मं. तथा सदस्य सचिव)

उपरोक्त समितीची दि.१०/११/२०१४ रोजी बैठक आयोजित करण्यात करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये सर्वोत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार देण्याबाबत नियमावली व अर्ज (Application Form) तयार करण्यात आलेला आहे.

सबब, शै.वर्ष २०१५-१६ पासून प्रस्तुत विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांतील प्राचार्यांना सर्वोत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार देण्याबाबत तयार करण्यात आलेली नियमावली व अर्ज (Application Form) विचारार्थ सादर).

**ठराव: प्रस्तुत विद्यापीठामार्फत सर्वोत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार देण्याबाबत तयार करण्यात आलेल्या नियमावलीस व अर्जाच्या नमुन्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. चांगल्या प्रतीचे सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, शाल, बुके असे या पुरस्काराचे स्वरुप राहील.**

**[ ०६ ] महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने तयार केलेला शै.वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षाचा दिर्घकालिन शैक्षणिक बृहत आराखडा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: म. वि. कायदा १९९४ कलम ८२(१) मध्ये बृहत आराखड्याबाबत खालीलप्रमाणे तरतूद आहे. म. वि. कायदा १९९४ कलम ८२(१) तरतूद - The university shall prepare a perspective plan and get the same approvad by the State Council for Higher Education for educational development for the location of colleges and institutions of higher learning in a manner ensuring equitable distribution of facilities for having due regard, in particular, to the need of unnerved and under ॒ developed areas within the jurisdiction of the university. Such plan shall be prepared by BCUD and shall be placed before the Academic Council and the Senate through the Management Council and shall, if necessary, be updated every year.

शै. वर्ष २०११-१२ ते २०१५-१६ या पाच वर्षाच्या बृहत आराखड्याचा कालावधी संपणार असून शै. वर्ष २०१६-१७ पासून नवीन महाविद्यालय सुरु करण्याचे प्रस्ताव स्विकारण्यासाठी सन २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षीय शैक्षणिक बृहत आराखडा तयार करावा लागणार आहे.

सदरबाबतचा विषय दि.१५/०७/२०१४ रोजीच्या महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाच्या बैठकीमध्ये ठेवण्यात आला असता खालीलप्रमाणे ठराव करण्यात आलेला होता.

| | |
|---|---|
| **१.** | **शै.वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षाच्या दिर्घकालीन बृहत आराखडा तयार करण्याकरीता स्थानिक वर्तमानपत्रामध्ये जाहिर निवेदन देऊन वेगवेगळया संस्था/महाविद्यालयाकडून सुचना मागवुन घेण्यात याव्यात.** |
| **२.** | **शै.वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षाच्या दिर्घकालीन बृहत आराखडा तयार करण्याकामी एक उपसमिती नेमण्याचे अधिकार मा.कुलगुरु महोदय यांना देण्यात आले.** |
| **३.** | **सदर बृहत आराखडा बाबतचा उपसमितीचा अहवाल पुढील महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाच्या बैठकीमध्ये सादर करण्यात यावा.** |

उपरोक्तप्रमाणे करण्यात आलेल्या ठरावाप्रमाणे शै.वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षाच्या दिर्घकालीन बृहत आराखडा तयार करण्याकरीता स्थानिक वर्तमानपत्रामध्ये जाहिर निवेदन देऊन वेगवेगळया संस्था/महाविद्यालयाकडून सुचना मागवुन घेण्यात आलेले होते. तसेच महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने दिलेल्या अधिकारान्वये मा.कुलगुरु महोदयांनी शै.वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षाचा दिर्घकालिन बृहत आराखडा तयार करण्याकामी खालीलप्रमाणे उपसमिती नियुक्ती केलेली होती.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा.प्रा.डॉ.एन.एन.मालदार | | | | अध्यक्ष |
| २. | श्री. धर्मराज काडादी | सदस्य | ३. | डॉ. बी. वाय. यादव | सदस्य |
| ४. | प्राचार्य डॉ. ए. एल. देशमुख | सदस्य | ५. | प्राचार्य डॉ. जी. एन. चिट्टे | सदस्य |
| ६ | प्राचार्य डॉ. एस. ए. हलकुडे | सदस्य | ७ | प्राचार्य एस. के. पवार | सदस्य |
| ८. | प्रा. डॉ. एस. एस. सुर्यवंशी | सदस्य | ९ | डॉ. महादेव देशमुख | सदस्य |
| १०. | डॉ. डी. जी. कदम | सदस्य | ११. | डॉ. श्रीकांत येळेगावकर | सदस्य |
| १२. | डॉ. पी. प्रभाकर | सदस्य | १३. | प्राचार्य आर. वाय. पाटील | सदस्य |
| १४. | डॉ. व्ही. पी. उबाळे | सदस्य | १५. | डॉ. गौतम कांबळे | सदस्य |
| १६. | डॉ. ए. एम. रंगरेज | सदस्य | १७. | डॉ. ॲनी जॉन | सदस्या |
| १८. | डॉ. पी. पी. वडगावकर | सदस्य | १९. | डॉ. जी. के. देशमुख | सदस्य |
| २०. | डॉ. एस. एन. सलवदे | सदस्य | २१. | प्राचार्य डॉ. एम. ए. दलाल | सदस्य |
| २२. | श्री. शरद ठाकरे | सदस्य | २३. | श्री. राम रेड्डी | सदस्य |
| २४. | श्री. उल्हास पाटील | सदस्य | २५. | श्री. के. एम. जमादार | सदस्य |
| २६. | प्राचार्य डॉ. बी. एम. भांजे | | | | सदस्य सचिव |

सदर उपसमितीची मा. कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दि.०७/११/२०१४ रोजी बैठक संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये वेगवेगळ्या व्यक्ती तथा संस्थाकडून प्राप्त झालेले निवेदने सादर करुन प्रस्तुत विद्यापीठाचा शै. वर्ष २०१५-१६ ते २०२०-२१ या पाच वर्षाच्या दिर्घकालिन बृहत आराखडा तयार करण्यात आलेला होता तसेच प्रस्तुत विद्यापीठातील सर्व संकुलाचे संचालक यांचेशी चर्चा करुन विद्यापीठ परिसरातील अभ्यासक्रमांचा बृहत आराखडा तयार करण्यात आलेला होता तसेच प्रस्तुत विद्यापीठातील सर्व संकुलाचे संचालक यांचेशी चर्चा करुन विद्यापीठ परिसरातील अभ्यासक्रमांचा बृहत आराखडा तयार करण्याचे अधिकार मा. कुलगुरुमहोदयांना देण्यात आलेले होते.

उपरोक्तप्रमाणे बृहत आराखडा उपसमितीने तयार केलेला शै.वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षाकरीता नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठीचा दिर्घकालिन बृहत आराखडा तसेच विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलाच्या संचालकांशी चर्चा करुन विद्यापीठ परिसरातील अभ्यासक्रमाचे मा.कुलगुरु महोदयांनी तयार केलेला बृहत आराखडा दि.१०/१२/२०१४ रोजीच्या महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळासमोर विषय क्र.३ अन्वये विचारार्थ सादर केला असता महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने सोबत जोडल्याप्रमाणे शै.वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षाचा दिर्घकालिन शैक्षणिक बृहत आराखडा तयार करुन सदर बृहत आराखडा व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेला आहे.

सबब, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने तयार केलेला शै. वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षाचा दिर्घकालिन शैक्षणिक बृहत आराखडा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव:** **महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने तयार केलेला शै.वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षाच्या दिर्घकालिन शैक्षणिक बृहत आराखड्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. त्याचप्रमाणे बार्शी येथे कला आणि वाणिज्य अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयाचा समावेश करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०७ ] M. E. Sem IV Project Viva साठी विद्यार्थ्यांकडून घेण्यात येणाऱ्या परीक्षा शुल्कात वाढ करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणीः या विद्यापीठांतर्फे घेण्यात येणाऱ्या M.E. Sem. IV च्या विद्यार्थ्यांना त्यांचा परीक्षा अर्ज व Synopsis परीक्षा विभागाकडे रु २९२०/- इतके शुल्कासह सादर झाल्यानंतर मा. अभ्यासमंडळ चे्अरमन यांना पत्र पाठवून त्यांच्याकडून सदर Dessertaion व Project Viva घेण्याकरिता पॅनल मागविले जाते. पॅनल आल्यानंतर सदर तीन बहिस्थ परीक्षकामधून दोन परीक्षंकाचे मा. कुलगुरु महोदयांकडून नामनिर्देशन करुन घेवून अनुक्रमानुसार संबधितांना Dessertaion Report Speed Post ने पाठवून दिला जातो. त्यानंतर सदर बहिस्थ परिक्षक विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शकांशी चर्चा करुन त्यांच्या सोईची तारीख कळवितात. त्यानुसार ठरलेल्या तारखेला M.E. Sem IV Project Viva संपन्न होतो. सदर बहिस्थ परिक्षक पुणे, मुंबई, सांगली कोल्हापूर अशा परगावाहून येतात. ते या परीक्षेसाठी प्रवास त्यांच्या स्वतःच्या कारने प्रवास करतात व प्रवास भत्ता म्हणून कार भाडयाची मागणी करतात. सदर संबधित मार्गदर्शकाच्या विनंती पत्रान्वये अशा बहिस्थ परिक्षकांना कार भाडे अदा करण्या करिता प्रत्येक वेळेस मा. कुलगुरु महोदयांची खास बाब म्हणून मान्यता घ्यावी लागते. M.E. Sem IV Project Viva या परीक्षेसाठी परीक्षा शुल्क रु २९२०/- इतके आहे. तसेच सदर परीक्षेसाठी परीक्षक मेहनताना हा रु.१५२/- आहे. हे रु १५२/- हे मार्गदर्शक व बहिस्थ परिक्षक यांना विभागून दिले जातात. तसेच कार भाडयापोटी अंदाजे ५०००/- पर्यत खर्ची घालावे लागतात.

सबब, उपरोक्त प्रमाणे ची परिस्थिती विचारात घेता M.E. Sem IV Project Viva साठी विद्यार्थ्याकडून घेण्यात येणा-या परीक्षा शुल्कात वाढ करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठरावः M. E. Sem IV Project Viva साठी विद्यार्थ्यांकडून घेण्यात येणाऱ्या परीक्षा शुल्कात वाढ करण्याबाबतचा विषय परीक्षा मंडळाच्या शिफारशीने पाठवावा असे सर्वानुमते ठरले.**

**[ ०८ ] विद्यार्थ्यांना अंतिम परीक्षेच्या गुणपत्रकासोबत Provisional Certificate देण्याबाबत व त्याकरिता अंतिम परीक्षेच्या परीक्षा शुल्कासोबतच रु.५०/- इतकी रक्कम घेण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: परीक्षा विभागाकडून विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार Passing व Provisional Certificate देण्यात येत आहेत. परंतु दोन्ही प्रमाणपत्राचा नमूना स्वतंत्र असल्याने दोन्हीचे एकत्रिकरण करुन घ्यावे लागणार आहे. जेणेकरुन विद्यापीठाचा छपाईचा खर्च वाचणार आहे. तसेच दोन वेळा एकच काम करावे लागत असल्याने कामाची पुनरावृत्ती टाळणे सोईचे होईल. याबाबत परीक्षा विभागाच्या दि.२०/०९/२०१४ रोजीच्या टिपणीवरील सदर बाबीस मा. कुलगुरु महोदयांनी तत्वतः मान्यता दिलेली असून सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करावा असे आदेश दिलेले आहेत.

सबब, विद्यार्थ्यांना अंतिम परीक्षेच्या गुणपत्रकासोबतच Provisional Certificate देण्याबाबत व त्याकरिता अंतिम परीक्षेच्या परीक्षा शुल्कासोबतच रु.५०/- इतकी रक्कम घेण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव: विद्यार्थ्यांना Passing Certificate ऐवजी अंतिम परीक्षेच्या गुणपत्रकासोबत Provisional Certificate देण्याबाबत व त्याकरिता अंतिम परीक्षेच्या परीक्षा शुल्कासोबतच रु.५०/- इतकी रक्कम घेण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०९ ] तक्रार निवारण समितीने केलेल्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी.**

(टिपणीः तक्रार निवारण समितीची बैठक दि.२९/११/२०१४ रोजी झालेली आहे. सदर तक्रार निवारण समितीचा कार्यवृत्तांत विद्यापीठ परिनियम ३३५ अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव ठेवणे आवश्यक आहे.

सबब, तक्रार निवारण समितीच्या दि.२९/११/२०१४ रोजी झालेल्या बैठकीचे कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

**ठरावः तक्रार निवारण समितीने केलेल्या शिफारशी स्विकारुन त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ १० ] दि.२३/०९/२०१४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ठराव क्र.०५ व ०६ नुसार वाणिज्य (Commerce) या विद्याशाखेच्या नावात वाणिज्य व व्यवस्थापन (Commerce and Management) व अभियांत्रिकी (Engineering) या विद्याशाखेतून औषधनिर्माणशास्त्र (Pharmacy) हा अभ्यासक्रम वेगळा करुन औषधनिर्माणशास्त्र (Pharmacy) ही स्वतंत्र विद्याशाखा निर्माण करण्यासाठी परिनियमात दुरुस्ती करण्यासंदर्भात घेतलेले निर्णय पुनश्चः विचारार्थ.**

(टिपणी: व्यवस्थापन परिषदेच्या दि.२३/०९/२०१४ रोजीच्या बैठकीत विषय क्र.०५ व ०६ अन्वये, खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला आहे.

| | |
|---|---|
| ठराव क्र.०५ | वाणिज्य (Commerce) या विद्याशाखेच्या नावात वाणिज्य व व्यवस्थापन (Commerce and Management) असा विस्तार करण्याबाबत परिनियमात बदल करण्याची विद्यापरिषदेने व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस स्विकारुन तशी शिफारस अधिसभेस करावी यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| ठराव क्र.०६ | अभियांत्रिकी (Engineering) या विद्याशाखेतून औषधनिर्माणशास्त्र (Pharmacy) हा अभ्यासक्रम वेगळा करुन औषधनिर्माणशास्त्र (Pharmacy) ही स्वतंत्र विद्याशाखा निर्माण करण्यासाठी परिनियमात दुरुस्ती करणे संदर्भात विद्या परिषदेने व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस स्विकारुन तशी शिफारस अधिसभेस करावी यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

वाणिज्य (Commerce) या विद्याशाखेच्या नावात वाणिज्य व व्यवस्थापन (Commerce and Management) असा विस्तार करण्यास व अभियांत्रिकी (Engineering) या विद्याशाखेतून औषधनिर्माणशास्त्र (Pharmacy) हा अभ्यासक्रम वेगळा करुन औषधनिर्माणशास्त्र (Pharmacy) ही स्वतंत्र विद्याशाखा निर्माण करण्यास वरीलप्रमाणे मान्यता देण्यात आली आहे.

तथापि, वाणिज्य व व्यवस्थापन (Commerce and Management) आणि औषधनिर्माणशास्त्र (Pharmacy) या विद्याशाखांमध्ये कोणकोणती अभ्यासमंडळे असतील आणि अशा प्रत्येक अभ्यासमंडळात कोणकोणते विषय असतील याबाबत उल्लेख करण्यात आलेला नाही. त्यामुळे संबंधित विद्याशाखेचे अधिष्ठाता तथा अभ्यासमंडळाचे अध्यक्ष यांचा अभिप्राय घेण्यात आलेला असून त्यानुसार वाणिज्य व व्यवस्थापन आणि औषधनिर्माणशास्त्र विद्याशाखेतंर्गत खालीलप्रमाणे अभ्यासमंडळे आणि त्यासमोर दर्शविल्याप्रमाणे विषय असतील.

## वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा
## (Faculty of Commerce and Management)

| अभ्यासमंडळे | विषय |
|---|---|
| Business Managament | **B.Com.-** Fundamental of Entraprenurship, Industrial Management, Modern Mangement Practices, B.C.A., B.B.A.,M.C.A.,M.B.A.<br>**M.Com.-** Business Finance, Management Concepts & Organizational Behaviour |
| Business Economics | **B.Com.-** Business Economics, Money & Financial System, Advanced Statistics, Advanced Banking, Co-operative Development.<br>**M.Com.-** Bank Management, Advanced Banking & Financial System, Managerial Economics, Advanced Statistics. |
| Accountancy | **B.Com.-** Corporate Accounting, Advanced Accounting, Advanced Cost Accounting.<br>**M.Com.-** Advanced Accounting, Advanced Costing, Taxation. |
| Commerce & M.Law | **B.Com.-** Business Regulatury Framework, Advanced Insurance,<br>**M.Com.-** Principles and Practice of Life & Health of Insurance, Advanced Marketing, Management Accounting. |

## औषधनिर्माणशास्त्र विद्याशाखा
## (Faculty of Pharamaceutical Sciences)

| अभ्यासमंडळे | विषय |
|---|---|
| Pharmacy | **B.Pharmacy –** Pharmaceutical Chemistry, Pharmaceutics, Pharmacalogy, Pharmacognosy<br>**M.Pharmacy –** Pharmaceutics, Quality Assurance, Pharmaceutical Chemistry. |

वरील तरतूदीसह वाणिज्य या विद्याशाखेच्या नावात वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा असा नामविस्तार आणि अभियांत्रिकी विद्याशाखेतून औषधनिर्माण हा विषय वेगळा करुन औषधनिर्माण अशी स्वतंत्र विद्याशाखा निर्माण करण्यासाठी परिनियमात दुरुस्ती करण्यासाठी अधिसभेस शिफारस करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव:** **दि.२३/०९/२०१४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ठराव क्र.०५ व ०६ नुसार वाणिज्य (Commerce) या विद्याशाखेच्या नावात वाणिज्य व व्यवस्थापन (Commerce and Management) व अभियांत्रिकी (Engineering) या विद्याशाखेतून औषधनिर्माणशास्त्र (Pharmacy) हा अभ्यासक्रम वेगळा करुन औषधनिर्माणशास्त्र (Pharmacy) ही स्वतंत्र विद्याशाखा निर्माण करुन त्यात खालीलप्रमाणे अभ्यासमंडळ आणि त्यासमोर नमूद केलेल्या विषयांना मान्यता देवून परिनियमात दुरुस्ती करण्यासंदर्भात अधिसभेस सर्वानुमते शिफारस करण्यात आली.**

## वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा
## (Faculty of Commerce and Management)

| अभ्यासमंडळे | विषय |
|---|---|
| Business Managament | **B.Com.-** Industrial Management, Modern Mangement Practices, Principles of Management, B.C.A., B.B.A., M.C.A., M.B.A.<br>**M.Com.-** Management Concepts & Organizational Behaviour, Management Accounting. |
| Business Economics | **B.Com.-** Business Economics, Money & Financial System, Advanced Statistics, Advanced Banking, Co-operative Development.<br>**M.Com.-** Bank Management, Advanced Banking & Financial System, Managerial Economics, Advanced Statistics. |
| Accountancy | **B.Com.-** Corporate Accounting, Advanced Accounting, Advanced Cost Accounting, Financial Accounting.<br>**M.Com.-** Advanced Accounting, Advanced Costing, Taxation, Research Methodology. |
| Commerce & M.Law | **B.Com.-** Fundamental of Entraprenurship, Business Regulatury Framework, Advanced Insurance, Principles of Marketing.<br>**M.Com.-** Business Finance, Principles and Practice of Life & Health of Insurance, Advanced Marketing. |

## औषधनिर्माणशास्त्र विद्याशाखा
## (Faculty of Pharamaceutical Sciences)

| अभ्यासमंडळे | विषय |
|---|---|
| Pharmacy | **B.Pharmacy –** Pharmaceutical Chemistry, Pharmaceutics, Pharmacalogy, Pharmacognosy<br>**M.Pharmacy –** Pharmaceutics, Quality Assurance, Pharmaceutical Chemistry. |

**<u>मा.कुलगुरुमहोदयांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषयः</u>**

**[११(१) ] परीक्षा केंद्रावर प्रश्नपत्रिका Download करण्यासाठी नियुक्त केलेल्या माहिती तंत्रज्ञान समन्वयक (Co-ordinator IT) यांना अंतर्गत परीक्षकांच्या मानधनाच्या ५० टक्के रक्कम प्रति सत्र देण्याची परीक्षा मंडळाने केलेली शिफारस विचारार्थ सादर.**

(टिपणी: परीक्षा कामकाजात ICT चा वापर करण्यासंदर्भात समिती गठीत करण्यात आलेली असून या समितीच्या दि.०४/०९/२०१४, दि.१८/०९/२०१४ व दि.१३/१०/२०१४ अशा एकूण तीन बैठक झालेल्या असून त्यातील दि.०४/०९/२०१४ रोजी झालेल्या ICT समितीच्या बैठकीमध्ये ठराव क्र.५ नुसार परीक्षा केंद्रावर नियुक्त केलेल्या माहिती व तंत्रज्ञान समन्वयकास प्रति सत्र अंतर्गत परीक्षकांच्या मानधनाच्या ५० टक्के रक्कम देय करण्याबाबत शिफारस करण्यात आलेली होती. तसचे ICT समितीच्या वरील सर्व झालेल्या बैठकीचा इतिवृत्तांत हा दि.२९/१०/२०१४ रोजी झालेल्या परीक्षा मंडळ बैठकीसमोर विषय क्र.१२ अन्वये ठेवण्यात आला असता मा. परीक्षा मंडळाने या सर्व बैठकीचा इतिवृत्तांताची नोंद घेवून मान्यता देण्यात आलेली आहे.

सबब, परीक्षा केंद्रावर प्रश्नपत्रिका Download करण्यासाठी नियुक्त केलेल्या माहिती तंत्रज्ञान समन्वयक (Co-ordinator IT) यांना अंतर्गत परीक्षकांच्या मानधनाच्या ५० टक्के रक्कम प्रति सत्र देण्याची परीक्षा मंडळाने केलेली शिफारस विचारार्थ सादर).

**ठरावः परीक्षा केंद्रावर प्रश्नपत्रिका Download करण्यासाठी नियुक्त केलेल्या माहिती तंत्रज्ञान समन्वयक (Co-ordinator IT) यांना अंतर्गत परीक्षकांच्या मानधनाच्या ५० टक्के रक्कम प्रति सत्र देण्याची परीक्षा मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[११(२) ] परीक्षा केंद्रावर प्रश्नपत्रिकेच्या छपाईपोटी होणारा खर्च हा प्रति विद्यार्थी साधारणता रु.१०/- इतकी देण्याची परीक्षा मंडळाने केलेली शिफारस विचारार्थ सादर.**

(टिपणी: परीक्षा कामकाजात ICT चा वापर करण्यासंदर्भात समिती गठीत करण्यात आलेली असून या समितीच्या दि.०४/०९/२०१४, दि.१८/०९/२०१४ व १३/१०/२०१४ अशा एकूण तीन बैठक झालेल्या असून त्यातील दि.०४/०९/२०१४ रोजी झालेल्या ICT समितीच्या बैठकीत ठराव क्र.७ ब. नुसार महाविद्यालयांना प्रश्नपत्रिकेच्या छपाईपोटी येणारा खर्च हा प्रति विद्यार्थीनुसार देण्यात यावा साधारण (रु.१०/- ते रु.१५/-) व याचा तुलनात्मक अभ्यास करावा. परंतु यासदंर्भात चर्चा करण्यात आली असता नियमित विद्यार्थ्यांना अंदाजे रु.१५/- व रिपीटर विद्यार्थ्यांना रु.५/- इतके शुल्क महाविद्यालयास द्यावी अशी चर्चा झाली. परंतु याबाबतचा अंतिम निर्णय हा प्रत्यक्ष येणाऱ्या अनुषंगाने निश्चित करावा असे ठरले. तसेच ICT समितीच्या वरील सर्व झालेल्या बैठकीचा इतिवृत्तांत हा दि.२९/१०/२०१४ रोजी झालेल्या परीक्षा मंडळ बैठकीसमोर विषय क्र.१२ अन्वये ठेवण्यात आला असता मा. परीक्षा मंडळाने या सर्व बैठकीच्या इतिवृत्तांताची नोंद घेवून मान्यता देण्यात आलेली आहे.

सबब, परीक्षा केंद्रावर प्रश्नपत्रिकेच्या छपाईपोटी होणारा खर्च हा प्रति विद्यार्थी साधारणता रु.१०/- इतका देण्याची परीक्षा मंडळाने केलेली शिफारस विचारार्थ).

**ठरावः परीक्षा केंद्रावर प्रश्नपत्रिकेच्या छपाईपोटी होणारा खर्च हा प्रति विद्यार्थी रु.१०/- इतका देण्याची परीक्षा मंडळाने केलेली शिफारस विचारात घेवून रु.१५/- प्रति विद्यार्थीप्रमाणे खर्च देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[११(३) ] प्रस्तुत विद्यापीठामार्फत "सोलापूर विद्यापीठ जीवनगौरव पुरस्कार" देण्याबाबत तयार करण्यात आलेली नियमावली व अर्ज (Application Form) विचारार्थ.**

(टिपणी: राष्ट्रीय मुल्यांकन आणि प्रत्यायन परिषद, (NAAC) बेंगळुर यांचेकडून प्रस्तुत विद्यापीठाचे मुल्यांकन करुन घेण्याची प्रक्रिया चालु आहे. याबाबत नियुक्त केलेल्या Steering Committee च्या बैठकीमध्ये झालेल्या ठरावामध्ये प्रस्तुत विद्यापीठाकडून दरवर्षी सर्वोत्कृष्ट महाविद्यालय व सर्वोत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार देण्याबाबत ठराव करण्यात आलेले आहे. त्यास अनुसरुन पुढील कार्यवाही सुरु आहे. तसेच प्रस्तुत विद्यापीठाकडून दरवर्षी राज्य व राष्ट्रीय पातळीवर कला, संस्कृती, साहित्य, शास्त्र, क्रीडा, शिक्षण व संशोधन, सामाजिक कार्य, कृषि, उद्योग व व्यापार आदी क्षेत्रामध्ये जीवनभर सामाजिक बांधिलकी मानून त्या कार्यासाठी स्वतःला वाहून घेणाऱ्या व त्या क्षेत्रामध्ये विशेष उल्लेखनीय योगदान (Outstanding / Extraordinary contribution) देणाऱ्या व्यक्तीस **"सोलापूर विद्यापीठ जीवनगौरव"** पुरस्कार द्यावयाचा आहे.

प्रस्तुत विद्यापीठातर्फे अद्याप एकाही व्यक्तीस जीवनगौरव पुरस्कार देण्यात आलेला नाही. अथवा जीवनगौरव पुरस्कार देण्याबाबत कोणतीही प्रक्रिया केली गेलेली नाही. तसेच अशा प्रकारचा पुरस्कार देण्याकामी नियमावली तथा अर्ज प्रस्तुत विद्यापीठाकडे उपलब्ध नव्हते त्यामुळे सदरबाबत उपरोक्त प्रमाणे पुरस्कार देण्याबाबत नियमावली तसेच अर्ज (Application Form)/ तयार करण्याकामी खालीलप्रमाणे समिती नियुक्त करण्यात आलेली होती.

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ. इरेश स्वामी | (अध्यक्ष) |
| २. | श्री. बाबुराव गायकवाड | (सदस्य) |
| ३. | डॉ. श्रीकांत येळेगावकर | (सदस्य) |
| ४. | प्राचार्य डॉ. आबासाहेब देशमुख | (सदस्य) |
| ५. | प्राचार्य डॉ. बी. एम. भांजे | (सदस्य सचिव) |

उपरोक्त समितीची दि.१९/१२/२०१४ रोजी बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीमध्ये **सोलापूर विद्यापीठ जीवनगौरव पुरस्कार** देण्याबाबत नियमावली व अर्ज (Application Form) तयार करण्यात आलेला आहे.

सबब, शै. वर्ष २०१५-१६ पासून प्रस्तुत विद्यापीठाकडून **सोलापूर विद्यापीठ जीवनगौरव पुरस्कार** देण्याबाबत तयार करण्यात आलेली नियमावली व अर्ज (Application Form) विचारार्थ सादर).

**ठरावः प्रस्तुत विद्यापीठामार्फत "सोलापूर विद्यापीठ जीवनगौरव" पुरस्कार देण्याबाबत तयार करण्यात आलेल्या नियमावली व अर्जास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[११(४) ] प्रस्तुत विद्यापीठातील संलग्नित महाविद्यालयातील सर्वोत्कृष्ट शिक्षक पुरस्कार देण्याबाबतचे सर्वसामान्य नियम, शिक्षकांना करावयाच्या अर्जाचा नमुना (Proforma), सोबत जोडण्यात आलेली प्रमाणपत्र व प्रतिज्ञापत्र विचारार्थ सादर.**

(टिपणी: राष्ट्रीय व प्रत्ययन परिषद (NAAC) बेंगळुर यांचेकडून प्रस्तुत विद्यापीठाचे मुल्यांकन करुन घेण्याची प्रक्रिया चालु आहे. याबाबत नियुक्त केलेल्या Stearing समितीची विद्यापीठातील सर्व संकुलातील संचालकांशी दिनांक २०/०९/२०१४ रोजी झालेल्या बैठकीमध्ये या विभागाशी संबंधित बाब क्र.२० नुसार **सर्वोत्कृष्ट शिक्षक पुरस्कार** देणेबाबत ठराव केला आहे.

प्रस्तुत विद्यापीठातर्फे अद्याप एकही शिक्षकांना सर्वोत्कृष्ट शिक्षक पुरस्कार देण्यात आलेला नाही. अथवा त्याबाबतची कोणतीही प्रक्रिया केली गेलेली नाही. तसेच सदरप्रमाणे पुरस्कार देणेकामी नियमावली Proforma तयार करणेसाठी मा. कुलगुरुमहोदयांनी समिती गठीत केलेली आहे.

मा. कुलगुरुमहोदयांनी गठीत केलेल्या समितीने दिनांक २८/११/२०१४ रोजी झालेल्या बैठकीच्या कार्यवृत्तांतानुसार पुरस्काराबाबतचे सर्वसामान्य नियम, Proforma, प्रमाणपत्र नमुना अ, प्रतिज्ञापत्र ब, व प्रमाणपत्र नमुना क नुसार नियमावली तयार करण्यात आलेली आहे.

सबब, शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकांना **सर्वोत्कृष्ट शिक्षक पुरस्कार** देण्याबाबत तयार करण्यात आलेले सर्वसामान्य नियम, शिक्षकांनी करावयाच्या अर्जाचा नमुना (Proforma), सोबत जोडावयाची प्रतिज्ञापत्र व प्रमाणपत्र व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

**ठराव: प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकांसाठी "सर्वोत्कृष्ट शिक्षक पुरस्कार नियमावली" स (शिक्षकांनी करावयाच्या अर्जाचा नमुना, (Proforma), त्यासोबतची प्रमाणपत्र व प्रतिज्ञापत्रास) सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[११(५)] विद्यापीठात विद्यार्थी सहाय्यता केंद्र / Student Facilitation Centre सुरु करणेची बाब विचारार्थ.**

(टिपणी: सोलापूर विद्यापीठ अंतर्गत ११९ महाविद्यालये संलग्नित असून या महाविद्यालयांना एकूण अंदाजे १,५०,००० इतके विद्यार्थी हे परीक्षेस प्रविष्ठ होत असतात. विद्यापीठाने एमकेसीएल कार्यप्रणाली अंतर्गत DU / DC - ई-सुविधा प्रकल्प राबविला जात असून या प्रकल्प अंतर्गत सर्व कामकाज हे ऑनलाईन स्वरुपाचे असून याद्वारे महाविद्यालये, विद्यार्थी व विद्यापीठातील सर्व अधिकारी कर्मचारी हे ऑनलाईन Digital University framework द्वारे जोडले गेलेले आहे.

विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक कालखंडामध्ये विविध प्रकारच्या कामासाठी विद्यापीठातील विविध विभागांशी संपर्क साधावा लागतो. तसेच विद्यार्थ्यांचे परीक्षा विषयक कामकाजासाठी वेळोवेळी परीक्षा विभागाशी संपर्क साधावा लागतो. यामध्ये परीक्षेचे वेळापत्रक, परीक्षा अर्ज सादर करावयाच्या तारखा, परीक्षा अर्जाच्या त्रुटी, प्रवेश पत्र प्राप्त न होणे, बैठक क्रमांक प्राप्त न होणे, गुणपडताळणी व पूर्नमूल्यांकन निकाल, गुणपत्रिका, निकाल जाहीर केव्हा होईल याबाबतची माहिती, निकालातील किंवा परीक्षा अर्जातील त्रुटींची माहिती, पदवीप्रदान समारंभाची माहिती, विद्यार्थ्यास आवश्यक असलेल्या विविध प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी आवश्यक असणारे शुल्क व त्यास लागणारे कागदपत्रे, विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमाची माहिती, शैक्षणिक पात्रताबाबत त्रुटी इ. माहितीची विद्यार्थ्यांना वेळोवेळी आवश्यकता असते.

सबब, वरील वस्तुस्थितीचा विचार करिता विद्यापीठात विद्यार्थी सहाय्यता केंद्राची स्थापना करण्याची गरज आहे. जेणेकरुन विद्यार्थ्यांना एकाच ठिकाणावरुन सर्व माहिती प्राप्त होवू शकेल व त्यांच्या त्रुटींचे निराकरण सत्वर होईल. याकरिता खालीलप्रमाणे उपलब्धता करावी लागणार आहे.

१. तीन दूरध्वनी / भ्रमणध्वनी.
२. तीन संगणक / लॅपटॉप (इंटरनेटसह), एक प्रिंन्टर व एक स्कॅनर.
३. स्वतंत्र कक्ष व अद्यावयात फर्निचर.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, पुणे विद्यापीठ, पुणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद या विद्यापीठांनी विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी सहाय्यता केंद्र स्थापन केलेली आहे.

सबब, सोलापूर विद्यापीठात विद्यार्थी सहाय्यता केंद्र स्थापन करण्याची बाब विचारार्थ).

**ठराव: विद्यापीठात विद्यार्थी सहाय्यता केंद्र / Student Facilitation Centre सुरु करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[११(६) ] दि.२२/१२/२०१४ च्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत वित्त व लेखा समितीने केलेल्या शिफारशीनुसार (विषय क्र.२(२) वगळून) व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.**

(टिपणी: दि.२२/१२/२०१४ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. तो General Statutes No.S.324 नुसार वित्त व लेखा समितीमध्ये तसेच व्यवस्थापन परिषदेमध्ये मान्यतेसाठी ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार दि.२२/१२/२०१४ रोजीच्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीत खरेदी समितीचा कार्यवृत्तांत सादर करण्यात आला असता, ठराव क्र.२(१) अन्वये व्यवस्थापन परिषदेस मान्यतेची शिफारस करण्यात आली.

सबब, दि.२२/१२/२०१४ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठरावः वित्त व लेखा समितीने केलेल्या शिफारशी स्विकारुन (विषय क्र.२(२) वगळून) दि.२२/१२/२०१४ च्या खरेदी समितीच्या कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[११(७) ] विद्यापीठाच्या सेंट्रल बँक, कोंडी येथील विविध खात्यातील शिल्लक रक्कमेवर व्याज मिळण्याकरीता सेंट समवृध्दी (Auto sweep) ही योजना लागू करणेसाठी वित्त व लेखा समितीने केलेली मान्यतेची शिफारस विचारार्थ.**

(टिपणी: या विद्यापीठाचे विविध बचत बँक खाते सेंट्रल बँक शाखा कोंडी येथे आहेत त्यामध्ये प्रामुख्याने विद्यापीठ फंड खाते, शासन अनुदान, एन. ई. एफ. टी. / आर. टी. जी. एस. खाते इ. मध्ये मोठया प्रमाणात रक्कमा शिल्लक असतात. सदर बँक खाते बचत स्वरुपाचे असल्याने त्यावर सहामाही पध्दतीने (सहामाही महिन्यातील अखेरच्या शिल्लकीवर) ३.५% ते ४% व्याज जमा होते. परंतु इतर वेळेस खात्यावर मोठी रक्कम असताना सुध्दा व्याज मिळत नाही. बऱ्याचदा सदर रकमा या दैनंदिन व्यवहारासाठी ठेवाव्या लागतात. सदर रकमा मुदतठेवी मध्ये गुंतविल्यास मुदतीप्रमाणे जादा व्याजदर मिळून विद्यापीठाचा फायदा व्हावा यासाठी सदर सेंट समवृध्दी ही योजना लागू करण्यासाठी सादर करण्यात येत आहे.

त्या अनुषंगाने सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा कोंडी यांच्याकडे माहिती घेतली असता त्यांनी खात्यामध्ये शिल्लक असणा-या रक्कमेवर व्याज मिळण्याकरीता सेंट समवृध्दी (Auto sweep) ही योजना राबविणे बाबत कळविले आहे. सोबत माहितीपत्रक जोडले आहे. .

सदर योजनेमध्ये भविष्यात लागणा-या रक्कमेचा अंदाज घेवून खात्यावरील एकूण कमाल शिल्लक रक्कमेची मर्यादा निश्चित केल्यास त्यावरील जादा शिल्लक रक्कम रु.५,०००/- च्या पटीत मुदत ठेवीमध्ये आपोआप वर्ग होईल. त्यासाठी एकूण मुदत ठेव किती मुदतीची ठेवायची आहे त्याची मुदत निश्चित करावी लागेल. मुदतीप्रमाणे बँक जादा शिल्लक रक्कमेतून रु.५,०००/- च्या पटीमध्ये ठेवलेल्या मुदतठेवीवर प्रलचित व्याजदराने व्याजाची रक्कम मुदत ठेवीची मुदत संपल्यानंतर त्या बचत खात्यामध्ये आपोआप जमा होईल. तसेच रक्कमेच्या कमाल मर्यादेपेक्षा जादा रक्कमेची आवश्यकता असल्यास जी शेवटीची मुदतठेव झाली आहे ती बंद होवून त्यांची रक्कम व्याजासह म्हणजे जेवढ्या दिवसासाठी मुदतठेव राहिली आहे, त्या कालावधीच्या प्रचलित व्याजदराप्रमाणे व्याजाची रक्कम मुदत ठेवीच्या मुळ रक्कमेसह बचत खात्यात आपोआप वर्ग होईल.

सदरची योजना विद्यापीठाच्या सर्व खात्याकरीता राबविता येऊ शकते. त्यामुळे शिल्लक रक्कमेवर बचत खात्यावर सध्या प्रचलित दराने मिळणाऱ्या व्याजापेक्षा जास्त व्याज मिळणार आहे.

यापूर्वी समान लेखा संहिता तरतुद १.६८ ते १.७२ नुसार विद्यापीठाच्या विविध खात्यातील शिल्लक रक्कमेची गुंतवणूक करण्यासाठी आराखडा तयार करण्याकामी मा.कुलगुरु यांच्या मान्यतेने गुंतवणूक समिती नियुक्ती करण्यात आली. सदर समितीने केलेल्या गुंतवणूक आराखडयास दि.०९/१०/२०१२ रोजीच्या वित्त व लेखा समितीने ठराव क्र.०३ अन्वये मान्यता देवून व्यवस्थापन परिषदेस शिफारस केली, त्यास दि.१६/१०/२०१२ रोजीच्या व्यवस्थापन परिषदने ठराव क्र.१९ अन्वये

मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरुन समान लेखा संहितेमधील तरतुद १.७२ नुसार मान्य गुंतवणूक आराखडयाप्रमाणे वित्त व लेखा अधिकारी यांच्या शिफारशीनुसार मा.कुलगुरु यांची मान्यता घेवून गुंतवणूक करता येते. सोबत ठरावाच्या प्रती जोडल्या आहेत.

सबब, सेंट समवृध्दी (Auto Sweep) ही गुंतवणूक योजना विद्यापीठाच्या विविध खात्याकरीता राबविण्यास, तसेच शिल्लक रक्कमेची कमाल मर्यादा आणि गुंतवणूकीची कालावधी याबाबत उपरोक्त मान्य ठरावाप्रमाणे समान लेखा संहितेतील तरतुद क्र.१.७२ नुसार कार्यवाही करण्याची बाब दि.२२/१२/२०१४ रोजीच्या वित्त व लेखा समिती समोर विचारार्थ सादर केला असता, त्यावर खालीलप्रमाणे ठराव झालेला आहे.

**ठरावः** सेंट समवृध्दी (Auto Sweep) ही गुंतवणुक योजना विद्यापीठाच्या विविध खात्याकरीता राबविण्यास तसेच शिल्लक रकमेची कमाल मर्यादा आणि गुंततणुकीचा कालावधी याबाबत समान लेखा संहिता मधील तरतुद १.७२ नुसार कार्यवाही करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेस मान्यतेची शिफारस करण्यात आली.

सबब, विद्यापीठाच्या सेंट्रल बँक, कोंडी येथील विविध खात्यातील शिल्लक रक्कमेवर व्याज मिळण्याकरीता सेंट समवृध्दी (Auto sweep) ही योजना लागू करणेसाठी वित्त व लेखा समितीने केलेली मान्यतेची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

ठरावः **विद्यापीठाच्या सेंट्रल बँक, कोंडी येथील विविध खात्यातील शिल्लक रकमांना सेंट समवृध्दी (Auto sweep) योजना लागू करण्याची वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

**सही/-**
**सचिव**
**व्यवस्थापन परिषद**

**सही/-**
**अध्यक्ष**
**व्यवस्थापन परिषद**